## ज्योतिषविषयक
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८४ वा | सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# तिजोरीत ठणठणाट, शेतकरी कर्जमाफी लटकणार

## सरकारला घेरण्यासाठी विरोधकांची रणनीती

## आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

## अजित पवारांची उणीव जाणवणार



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात वाढलेल्या अत्याचाराच्या घटना, घोटाळ्यांचे 'पीक', मंत्रालयातील लाचखोरी, रद्द झालेले मुस्लिम आरक्षण, बिघडलेली कायदा-सुव्यवस्था, मेट्रो दुर्घटना आणि तिजोरीतील ठणठणाटामुळे लटकणारी शेतकरी कर्जमाफी अशा आव्हानांमुळे सोमवारपासून सुरू होणारे विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सरकारसाठी 'अग्निपरीक्षा'च ठरणार आहे.

### 6 मार्चला अर्थसंकल्प
राज्याचा सन 2026-27 या वर्षाचा अर्थसंकल्प शुक्रवार, 6 मार्च रोजी दुपारी 2 वाजता सादर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधानसभेत तर वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल हे विधान परिषदेत अर्थसंकल्प मांडतील. मुख्यमंत्र्यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी वित्तमंत्री या नात्याने सन 2023-24 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला होता.

सत्ताधारी कारभार करताना सर्वच पातळीवर अपयशी ठरल्यामुळे विरोधकांनीही सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी रणनीती आखली आहे. त्यामुळे सरकारला अर्थसंकल्पीय अधिवेशन चांगलेच 'भारी' पडणार आहे.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावरच मंत्रालयातील लाचखोरीचे प्रकरण पुढे आले आहे. यामध्ये अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधक आक्रमक होणार आहेत. यापूर्वी संतोष देशमुख हत्याप्रकरणी धनंजय मुंडे आणि नाशिकमध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारावर घर घेतल्याच्या मुद्द्यावरून कोर्टाने दोषी ठरवलेले माणिकराव कोकाटे यांना मंत्रीपद गमवावे लागले होते. त्यानंतर नरहरी झिरवाळ यांचे मंत्रीपद जाणार की सरकार त्यांना सांभाळून घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुण्यातील मुंढवा येथील वादग्रस्त जमीन खरेदी व्यवहाराची चौकशी करणाऱ्या खारगे समितीचा अहवाल अधिवेशनात सादर होण्याची शक्यता आहे. यामध्ये पार्थ पवार यांना क्लीन चिट मिळाल्याची चर्चा आहे. या अहवालातील शिफारशींवर सरकार काय निर्णय घेणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पुरवणी मागण्या पहिल्या दिवशी नाहीत
विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात सोमवारी राज्यपालांच्या अभिभाषणाने होईल. आतापर्यंतच्या अधिवेशनाच्या परंपरेनुसार पहिल्या दिवशी अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवून पुरवणी मागण्या सादर होतात. यंदा राज्यपालांचे अभिभाषण झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला जाईल. या शोकप्रस्तावावरील चर्चेत सर्वपक्षीय आमदार सहभागी होऊन अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देतील. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा परिचय सभागृहाला करून देतील.

### मंगळवारी पुरवणी मागण्या
अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस सन 2025-26 या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर करतील.

### अजित पवारांची उणीव जाणवणार
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर प्रथमच विधिमंडळाचे अधिवेशन होत आहे. त्यामुळे गेली साडेतीन दशके विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत आपल्या कामाचा ठसा उमटविणाऱ्या अजित पवार यांची उणीव या अधिवेशनात प्रकर्षाने भासेल.

# झेड.पी. अध्यक्षपद देऊन जयकुमार गोरे मोहोळचे पालकत्व स्वीकारतील..?

## कामती गटाच्या विमलताई खताळ यांना संधी मिळण्याची शक्यता

## माजी आमदार राजन पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** नुकताच लोकेनेते परिवाराने भाजपा मध्ये प्रवेश केला. प्रवेशानंतर ग्रामीण भागातील ही त्यांची कमळ चिन्हावरील पहिलीच निवडणूक. या निवडणुकीत माजी आमदार राजन पाटील यांनी भाजपाच्या माध्यमातून वर्चस्व सिद्ध केले. भाजप हा सत्तेतला पक्ष जरी असला तरी मोहोळ विधानसभा आमदार हा विरोधी पक्षाचा अर्थात अनगरकर विरोधक आहे. त्यामुळे मोहोळ तालुक्याच्या भरीव विकासासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे हाच पर्याय सध्यातरी असून सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष मोहोळच्या वाट्याला देऊन मोहोळचे 'पालकत्व' पालकमंत्री स्वीकारतील काय... ? असा प्रश्न


जयकुमार गोरे


राजन पाटील


विमलताई खताळ

कार्यकर्त्यांकडून विचारला जात आहे. यदाकदाचित संधी मिळाली तर तालुक्याचे भाग्यविधाते राजन पाटील कुणाला संधी देणार... ? याकडे देखील लक्ष लागले असून यासाठी कामती गटाच्या सदस्या विमलताई खताळ यांचे नाव यानिमित्ताने चर्चेत आले आहे.

खरंतर या अगोदरच्या आणि सध्याच्या सरकारमध्ये सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद नसल्याने जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी इतर मंत्र्याच्या खांद्यावर टाकावी लागत आहे. अर्थात यामुळे वेगवेगळे पालकमंत्री नेहमीच चर्चेत राहिले. मात्र सध्याच्या महायुती सरकारमध्ये सोलापूर जिल्ह्याच्या वाट्याला आलेल्या सध्याच्या पालकमंत्र्यांची क्रेझ झाली असून सोलापूर जिल्ह्यावर सर्वाधिक प्रेम करणारा पालकमंत्री म्हणून जयकुमार गोरे यांची ओळख तयार झाली आहे. एवढंच काय..? पण पक्षाच्या दृष्टीने देखील त्यांनी चांगलीच मशागत केली असून महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या निवडणुकीत देखील त्यांचा करिष्मा दिसून आला आहे.

दरम्यान काल पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे ३८ सदस्य निवडून आणण्यात पालकमंत्र्यांचा सिंहाचा वाटा आहे. आता काही दिवसातच अध्यक्ष उपाध्यक्ष पदाच्या निवडी पार पडणार आहेत. त्यामुळे सर्वच तालुक्यांकडून जोरदार रस्सीखेच होताना दिसत आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष ओबीसी सर्वसाधारण आहे. मोहोळ तालुक्याला आजतागायत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष कधीच मिळाले नाही. त्यामुळे सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील व माजी आमदार यशवंत माने अध्यक्षपदासाठी आग्रही राहणार का.. ? याकडे लक्ष लागले आहे.

### धनगर समाजाची वोट बँक
मोहोळ तालुक्यात धनगर समाजाची मोठी वोटबँक आहे. समाजाला नेहमीच न्याय देण्याची भूमिका माजी आमदार राजन पाटील यांनी घेतली आहे. कालच्या जिल्हा परिषद निवडणुकीत निवडून आलेल्या चार पैकी दोन जि.प. सदस्य धनगर समाजाचे आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष साठी धनगर समाजाचे नाव प्रामुख्याने वरच्या स्थानी आहे. त्यामुळे समाजाचा विचार करता कामती गटातून निवडून आलेल्या विमलताई खताळ यांना संधी मिळणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे... ?

### अनगरकरांशी निष्ठा व पालकमंत्र्यांशी स्नेहपूर्ण संबंध
स्व. तानाजीराजे खताळ व अनगरकर पाटील परिवाराचा अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध. काही काळ वगळता खताळ परिवार नेहमीच निष्ठेने काम करत राहिले आहे. शिवाय पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या पत्नी सोनियाताई गोरे यांच्याशी जय शंकर परिवाराचे स्नेहपूर्ण व आपुलकीचे संबंध आहेत. त्यामुळे अनगरकरांनी व पालकमंत्र्यांनी खटाळ यांच्यावर विश्वास टाकल्यास ते नक्कीच विश्वासात पात्र राहून काम करतील असे राजकीय विश्लेषकांमधून बोलले जात आहेत.

# 'शक्तिपीठ' रद्दसाठी आज राज्यव्यापी आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्र्यांचा कंत्राटदारधार्जिणा व शेतकरीविरोधी वादग्रस्त शक्तिपीठ महामार्ग रेटण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी परभणीतील शेतकऱ्यांवर झालेल्या पोलिसी अत्याचाराचा निषेध आज झालेल्या 'शक्तिपीठ'बाधित शेतकऱ्यांच्या राज्यव्यापी बैठकीत करण्यात आला.

दरम्यान, शक्तिपीठ महामार्ग रद्दच्या मागणीसाठी सोमवारी (23 रोजी) राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. यामध्ये कोल्हापुरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने, विधानसभा अधिवेशनकाळात मुंबईत गोलमेज परिषद तसेच ग्रामसभांचे महामार्गाविरोधात ठराव घेण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपताच महाराष्ट्र सरकारने शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा होणारा विरोध मोडून काढून तो रेटण्याचा 'ट्रेलर' काल (दि. 20) परभणीत सहजपूर आणि जवळा या गावांमध्ये शासकीय अधिकारी व पोलिसांनी दाखविला. महिला व शेतकऱ्यांवर झालेल्या अमानुष अत्याचाराचा आज राज्यव्यापी ऑनलाइन बैठकीमध्ये तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. तर, येत्या सोमवारी (23 रोजी) विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यभर मोर्चे, धरणे, निदर्शने, 'रास्ता रोको' आंदोलने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मुंबईत बाधित शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची व नागरी संघटनांची मिळून आठ दिवसांत गोलमेज परिषद आयोजित करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर, परभणीचे शेतकरी कैलास चांगभले, सांगलीचे दिगंबर कांबळे, लातूरचे गजेंद्र येळकर, नांदेडचे सुभाष मोरलवार, बीडचे व्यंकटराव ढोरे, हिंगोलीचे बापूराव ढाके, धाराशिवचे संभाजी फडतरे, सोलापूरचे गणेश घोडके यांनीही शक्तिपीठ महामार्गाला कडाडून विरोध केला.



### शेतकऱ्यांच्या बाजूने लढणार - आमदार सतेज पाटील
काँग्रेसचे आमदार सतेज पाटील म्हणाले, 'गरज नसलेला हा महामार्ग मुख्यमंत्री केवळ कंत्राटदारांचे हित लक्षात ठेवून रेटत आहेत. यासाठी परभणीत शेतकऱ्यांवर अमानुष अत्याचार केला गेला. यापुढे हा अत्याच्यार वाढण्याची शक्यता असली, तरी शेतकरी एकजुटीने तो परतवून लावतील. यापुढेही मी स्वतः शेतकऱ्यांच्या बाजूने लढत राहणार असून, अधिवेशनात विरोधकांची एकजूट करून आवाज उठवणार आहे.'

### सरकारला महामार्ग रद्द करावाच लागेल - राजू शेट्टी
माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, 'ज्या गावात मोजणी होत आहे, त्या गावांत इतर जिह्यांतील शेतकऱ्यांनी जाऊन संघर्ष करणे गरजेचे आहे. शक्तिपीठ महामार्गात मोठा भ्रष्टाचार होत आहे. मोबदल्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चुकीची माहिती पसरवली जात आहे. सरकारला हा महामार्ग रद्द करावाच लागेल, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. परभणीतील शेतकऱ्यांवरील अत्याचार निंदनीय आहे. पूर्वीसारखे ग्रामसभांचे ठराव नव्याने करूया. धाराशिवमध्ये हा महामार्ग होऊ देणार नाही. **- कैलास पाटील,** आमदार धाराशिव

# मोहोळ शहरात अखेर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारला, पोलिस छावणीचे स्वरूप

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ शहरात विनापरवानगी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. माहितीनुसार, काल मध्यरात्री 'शंभूप्रेमीं'कडून मोहोळ एसटी स्टॅन्डसमोरील चौकात पुतळा उभारण्यात आला.



सकाळी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास येताच पुतळा हटविण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या. संबंधित ठिकाणी उभारणीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र पुतळ्याचा कोणत्याही प्रकारचा त्रास कोणालाही होत नाही. त्यामुळे प्रशासनाने सदर पुतळ्याबाबत सकारात्मक विचार करून शंभू प्रेमींना सहकार्य करावे. अशी चर्चा इतिहास तज्ञ व विचारवंत यांच्या गोटात चालू आहे.

मात्र पुतळा हटवण्याच्या हालचालींना स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. "हा पुतळा हटवला तर मोहोळ बंद ठेवू," असा इशारा शंभूप्रेमींनी दिला आहे. त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पुतळा उभारण्यात आलेल्या एसटी स्टॅन्ड चौकात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत आहे. पुतळा पाहण्यासाठी लोकांची सतत वर्दळ सुरू असून वातावरण तणावपूर्ण बनले आहे. संभाव्य वाद टाळण्यासाठी पोलिसांनी पुतळ्याभोवती जाळ्या लावून परिसर बंदिस्त केला आहे.




# सोलापूर जिल्ह्यातील धरणे होणार आता गाळमुक्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील २१२ प्रकल्पातून गाळ काढण्यास मंजुरी देण्यात आली होती, त्यापैकी १६५ प्रकल्पातून तीन वर्षात ११६.८६ दशलक्ष घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. गाळमुक्त धरण योजनेचा ८ हजार ६५६ शेतकऱ्यांनी लाभ घेतला असून ३ हजार २८० हेक्टर सुपीक झाली आहे तर धरणातील गाळ काढल्याने ११ हजार ६८६ सहस्र घनमीटर इतक्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.

जलसंधारण विभागाच्या वतीने जिल्ह्यात २०२३-२४ मध्ये ५२, २०२४-२५ मध्ये ८६ तर २०२५-२६ मध्ये २७ प्रकल्पातून गाळ काढण्यात आला आहे. बार्शी तालुक्यातील सर्वाधिक तलावातून गाळ उपसा केला आहे. ६३.७६ लाख घन मीटर गाळ उपसा केल्याने ६ हजार ३७६ सघमी (सहस्त्र घन मीटर) इतका पाणीसाठा वाढला आहे. उत्तर सोलापूर तालुक्यात १८.५१ लाख घमी गाळ उपसा केल्याने१८५१ सघमी पाणीसाठा वाढला आहे. २१२ पैकी १६५ प्रकल्पातून गाळ उपसा करण्यात आला आहे. उर्वरित ४७ प्रकल्पांत पाणीसाठा असल्याने कामे बंद आहेत. ४७ प्रकल्पांतून १६ लाख ८३ हजार घनमीटर गाळ उपसा करण्यात येणार आहे.



> जिल्ह्यातील २१२ प्रकल्पांतून गाळ उपसा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी १६५ ठिकाणाहून ११६ लाख घन मीटर गाळ उपसा करून ३२८० हेक्टरवर टाकण्यात आला आहे. याचा जिल्ह्यातील ८६५६ शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. यंदाही गाळ काढण्याची मोहीम सुरू राहणार आहे. प्रकल्पातील पाणीसाठा कमी झाल्यानंतर गाळ उपसा करण्यात येणार आहे.
> **- राहुल क्षीरसागर,** जिल्हा जलसंधारण अधिकारी

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंच असणार प्रशासक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने मुदत संपलेल्या आणि नजीकच्या काळात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीचा आदेश काढला असून, विद्यमान सरपंच, उपसरपंच, सदस्य यांना प्रशासक म्हणून काम करण्याची लॉटरी लागली आहे.

जिल्ह्यातील 655 ग्रामपंचायतींवर प्रशासक राज्य येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील फेब्रुवारी 2026 अखेर मुदत संपलेल्या 655 ग्रामपंचायतीच्या सरपंच, सदस्यांना राज्य शासनाने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. विद्यमान सरंपच, ग्रामपंचायत सदस्य यांच्या समावेश असलेली प्रशासक मंडळ ग्रामपंचायतीत स्थापन करण्याचे आदेशही राज्य शासनाने दिले आहेत.


मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर

प्रशासकांची निवड करण्याचे अधिकार राज्य शासनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते. त्या अधिकारानुसारच राज्य शासनाने आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून सरपंच, सदस्यांची निवड करण्याचे आदेश दिले आहेत.

### सरपंच परिषदेच्या मागणीस यश
राज्यातील फेब्रुवारी 2026 अखेर मुदत संपणाऱ्या 14 हजार 234 ग्रामपंचायतीवर विद्यमान पदाधिकारी यांचीच निवड करण्याची मागणी सरपंच परिषद संघटनेनचे राज्याध्यक्ष दत्ताभाऊ काकडे व पदाधिकाऱ्यांनी यांनी शासनाकडे केली होती. या निर्णयासाठी उच्च न्यायालयात देखील धाव घेतली होती. मात्र शासनाचे ग्रामविकास विभागाने प्रशासक म्हणून सरपंच तर उपसरपंच व सदस्यांची प्रशासकीय समीती नियुक्तीचे आदेश काढल्याने सरपंच परिषदेच्या मागणीस यश आले आहे. या निर्णयामुळे गावातील विकास कामास व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास गती मिळणार आहे, असे सरपंच परिषद, सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षा कविता घोडके -पाटील यांनी सांगितले.

## संपादकीय

# छोट्या शहरांची काळवंड

वायू प्रदूषण ही केवळ महानगरं आणि बड्या शहरांची समस्या आहे, हा आभास आता संपुष्टात आला आहे. छोटी शहरंदेखील प्रदूषित हवेचा विळखा सोसत आहेत. काही संदर्भात तर ही परिस्थिती महानगरांच्या तुलनेत अधिक भयावह व चिंताजनक असल्याचे दिसून येते.

देशव्यापी प्रदूषणासंदर्भात आमच्या एका सहकार्याने गेल्या वर्षी केलेल्या सखोल अभ्यासातून काही विस्मयकारक निष्कर्ष समोर आले आहेत. या अभ्यास अहवालानुसार वायू प्रदूषणाचे नवे हॉटस्पॉट आता बनीर्हाटसारख्या छोट्या नगरांच्या रूपाने उदयाला येत आहेत. हे शहर ईशान्येकडील आसाम आणि मेघालय राज्यांच्या सीमेवर वसलेले आहे. पीएम 2.5 च्या वार्षिक स्तराचा विचार करता या शहराने दिल्लीलाही मागे टाकले होते. याच धर्तीवर गुरुग्राम, श्रीगंगानगर, फरिदाबाद, ग्रेटर नोएडा आणि मुझफ्फरनगर या शहरांचाही समावेश त्या यादीत झाला आहे, जिथे वायू प्रदूषणाची पातळी सातत्याने धोक्याच्या मर्यादेबाहेर असते. भारतातील वायू प्रदूषणाच्या स्वरूपात होत असलेला हा एक आमूलाग्र बदल आहे. याचाच अर्थ असा की, आता लहान शहरांमध्येही सुधारणा घडवून आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे अनिवार्य झाले आहे. यासाठी आपल्याला नियामक चौकट अधिक बळकट करावी लागेल, देखरेख यंत्रणा सुधारावी लागेल आणि प्रतिबंधात्मक उपायांची कठोर अंमलबजावणी करावी लागेल; मात्र हे सर्व प्रयत्न तेव्हाच फलद्रूप होतील जेव्हा सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातील हवेचा दर्जा नेमका किती खालावला आहे, याची कल्पना असेल.

वायू प्रदूषणाच्या संकटाशी दोन हात करण्याचा सर्वात सोपा मार्ग आपल्याकडे हाच अवलंबला जातो की, जनतेला वास्तवाची जाणीवच करून द्यायची नाही. हे घडण्यामागचे कारण म्हणजे आपण ज्या हवेत श्वास घेतो, तिचे मोजमाप करण्याची पुरेशी यंत्रणा देशाच्या बहुतांश भागांत अस्तित्वात नाही. परिणामी, नागरिक वायू प्रदूषणाच्या माहितीपासून अनभिज्ञ राहतातच, शिवाय प्रदूषणाची पातळी वाढल्यानंतर आरोग्याची हानी टाळण्यासाठी सावधगिरीच्या कोणत्या उपाययोजना कराव्यात, याचीही त्यांना कल्पना नसते. जागतिक स्तरावर वायू प्रदूषण मोजण्यासाठी एअर क्वालिटी इंडेक्स म्हणजेच वायू गुणवत्ता निदेर्शांकाचा वापर केला जातो. प्रगत देशांमध्ये या माहितीचा उपयोग जनजगृतीसाठी आणि त्यानंतर प्रशासकीय कारवाईसाठी केला जातो. तिथे लोकांना नेमकी कोणती खबरदारी घ्यावी, हे ठाऊक असते आणि स्थानिक प्रशासनालाही प्रदूषणाशी लढण्यासाठी कोणत्या पावलांची गरज आहे, याची जाणीव असते. म्हणूनच बीजिंगमध्ये रेड अलर्टच्या काळात शाळांना सुट्टी दिली जाते, तर पॅरिसमध्ये स्मॉगच्या दिवसांत डिझेल वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लादले जातात.

भारत मात्र या बाबतीत पिछाडीवर आहे. काही मोजके अपवाद वगळता आपल्याकडे अशा केंद्रांचे जाळे नाही जे आपल्याला रिअल टाईममध्ये धोक्यांची पूर्वसूचना देऊ शकेल. सध्या आपल्याकडे 966 मॅन्युअल स्टेशन्स आहेत, जी हवेचे नमुने संकलित करून ते प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवतात. ही केंद्रे साधारण 24 तासांनंतर दिवसाची सरासरी आकडेवारी देऊ शकतात, तीसुद्धा तेव्हाच जेव्हा एखादी व्यक्ती ती माहिती संकलित करून, तिचे विश्लेषण करून लोकांशी संवाद साधेल. नियमितपणे अशा प्रक्रियेचे पालन करणे जिकिरीचे असते, म्हणूनच बहुतांश आकडेवारी ही शिळी असते. बहुतांश मॅन्युअल स्टेशन्स वर्षातून 104 दिवस देखरेख करण्याची किमान निकषही पूर्ण करताना दिसत नाहीत. त्वरित माहिती देर्णाया रिअल टाईम स्टेशन्सचा विचार केल्यास देशातील 296 शहरांमध्ये केवळ 567 अशी केंद्रे कार्यरत आहेत. ही स्थिती अशावेळी आहे जेव्हा देशात 4,000 पेक्षा अधिक शहरं आणि नगरं आहेत. 2010 च्या तुलनेत मॅन्युअल स्टेशन्सची संख्या दुपटीने वाढली आहे आणि रिअल टाईम स्टेशन्समध्येही 20 पट वृद्धी झाली आहे, हे मान्य केले, तरी 40 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या अजूनही वायू प्रदूषणाच्या देखरेख यंत्रणेच्या परिघाबाहेर आहे. सुमारे 60 टक्के लोकांना आपल्या परिसरातील वायू गुणवत्ता निदेर्शांकाची माहितीच नसते. सहा मुख्य प्रदूषकांवर लक्ष ठेवर्णाया शहरांची संख्या तर 200 पेक्षाही कमी आहे.

या केंद्रांच्या उभारणीचा आणि देखभालीचा खर्च हा कळीचा मुद्दा ठरू शकतो. एक रिअल टाईम स्टेशन उभारण्यासाठी सुमारे एक कोटी रुपयांची गुंतवणूक लागते आणि त्याच्या वार्षिक देखभालीचा खर्च 18 ते 20 लाख रुपयांच्या घरात जातो. मॅन्युअल स्टेशनसाठी साधारण 8 ते 10 लाख रुपये लागतात. अशा परिस्थितीत हवेच्या देखरेखीसाठी आपल्याला नवनवीन संशोधनाला प्रोत्साहन देणे भाग आहे. आपले तरुण जेव्हा स्टार्टअप्सच्या माध्यमातून जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत आहेत, तेव्हा त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग या क्षेत्रात का केला जाऊ नये? त्याचप्रमाणे प्रतिबंधात्मक रणनीतीमध्येही सुधारणा होणे आवश्यक आहे. लहान शहरांमध्ये बांधकाम ही काळाची गरज असली, तरी पर्यावरणपूरक बांधकामांना प्राधान्य देऊन आपण तिथल्या हवेचा दर्जा टिकवू शकतो. आता पर्यावरणावर होणारा विपरीत परिणाम किमान असेल अशा बांधकाम साहित्याचा वापर वाढवणे गरजेचे आहे. नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या वापरासह ऊर्जाक्षम रचनेसाठी लोकांना प्रोत्साहित केले पाहिजे, जेणेकरून कार्बन फूटप्रिंट कमी होईल.

वाहनांच्या वाढत्या संख्येबाबतही गांभीयार्ने विचार होणे गरजेचे आहे. वाहनांच्या संख्येतील वाढ ही मानवी लोकसंख्येच्या वाढीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. हा केवळ योगायोग नाही. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या अभावामुळे लोकांना नाईलाजाने खासगी वाहनांकडे वळावे लागत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जशी कमकुवत झाली, तसा दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा ओघ वाढला. अमेरिकेत ऑटोमोबाईल उद्योगाने जाणीवपूर्वक रेल्वे आणि ट्रॅम वे व्यवस्था मोडीत काढण्यासाठी त्या विकत घेतल्या होत्या, जेणेकरून त्यांच्या गाड्यांचा खप वाढेल. भारतात ही प्रक्रिया अधिक सहजपणे घडली. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी खासगी कंपन्यांना कोणत्याही गुंतवणुकीची गरज पडली नाही. हे कार्य सरकारांनीच ओढवून घेतले. बहुतेक शहरांमध्ये बसेस या वाहतूक कंपनी म्हणून नाही, तर केवळ एक रोजगार देणारी सेवा म्हणून कार्यरत आहेत. त्यातच सरकारने सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेली गुंतवणूकही केली नाही.

ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता आता लहान शहरांकडे अधिक गांभीयार्ने लक्ष देण्याची वेळ आली आहे. जगातील पाच मोठ्या आर्थिक महासत्तांमध्ये स्थान मिळवलेला भारत या वास्तवाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. विशेषतः अशावेळी जेव्हा वायू प्रदूषणामुळे देशात दरवर्षी 15 ते 17 लाख नागरिक आपला जीव गमावत आहेत.

# ब्लॅक बॉक्स... सत्य कसे सांगणार?

## विमान अपघातातील रहस्यांचा उलगडा करणाऱ्या 'ब्लॅक बॉक्स' च्या शोधाची उलटतपासणी

## 'अजितदादांचा विमान अपघात की घातपात; ह्या प्रश्नामागचा संशय दूर करणार का?



**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार - संपादक)



अजितदादा पवार यांचा "अपघात की घातपात" ह्या प्रश्नाला रोहित पवार यांनी तीन पत्रकार परिषदांतून घातपाताचा संशय पक्का व्हावा, इथपर्यंत नेऊन ठेवले आहे. मुंबई- बारामती प्रवास कारने करण्याचे ठरले असताना, अजितदादांवर आयत्यावेळी विमान प्रवास करण्याची वेळ का आणि कुणामुळे आली? अपघातातील विमान; विमान कंपनी; विमानचालक कोणत्या पात्रतेचे होते? ह्या अपघाताच्या पुढे-मागे कोणत्या राजकीय हालचाली झाल्या? अपघात तपासणीत कोणत्या उणिवा राहिल्यात? विमानाची सध्याची किंमत १५ कोटी असताना, ५० कोटी रुपयांचा विमा कसा काढला गेला? विमान कंपनीचा मालक व्ही के सिंग ह्याचा मुलगा पायलट रोहित सिंग अपघातानंतर अमेरिकेत कसा पळाला? अशा अनेक प्रश्नांच्या संबंधांनी रोहित पवार यांनी सविस्तर माहिती देऊन, अजितदादांचा विमान अपघात हा घातपात आहे, ह्या संशयाला बळकटी दिली आहे. त्याला पूरक असे गौप्यस्फोट अजितदादांच्या 'राष्ट्रवादी काँग्रेस' पक्षाचे विधानपरिषद आमदार अमोल मिटकरी यांनी केले आहे. विधान अपघात झाला, त्याआधी विमानात काय झाले; त्याची माहिती देणारा "ब्लॅक बॉक्स" सहिसलामत सापडला असता, तर रोहित पवार आणि अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांतील घातपाती संशयाची तीव्रता कमी झाली असती. तथापि, "ब्लॅक बॉक्समधून तपास यंत्रणेला काही मिळणार नाही," असा अंदाज महाराष्ट्र प्रदेश "काँग्रेस"चे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी व्यक्त केला; आणि पुढे तसेच घडले. "ब्लॅक बॉक्स सापडला, पण तो आगीमुळे जळालाय; त्याचे नुकसान झाले," अशी माहिती "विमान अपघात तपास यंत्रणा-AAIB"ने अधिकृतपणे १७ फेब्रुवारीला, म्हणजे अपघात झाल्यावर २० दिवसांनी जाहीर केली.

ह्यासाठी काढलेल्या परिपत्रकात AAIB ने ब्लॅक बॉक्सचा उल्लेख केलेला नाही. "विमानात डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर (DFDR) आणि कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर (CVR) असे दोन स्वतंत्र रेकॉर्डर होते. ह्या दोन्ही रेकॉर्डरचे अपघातदरम्यान लागलेल्या आगीत तीव्र उष्णतेच्या संपर्कात आल्यामुळे नुकसान झाले," असल्याचे AAIB च्या परिपत्रकात म्हटले आहे. ह्यातील DFDR-रेकॉर्डरमधील तपशील AAIB च्या प्रयोगशाळेत डाउनलोड झाला आहे. परंतु, CVR- रेकॉर्डमधील डेटा गोळा करण्यासाठी सदर विमानाच्या परदेशी कंपनीशी संपर्क साधण्यात आल्याचेही AAIB म्हणते.

"कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर (CVR)" आणि "डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर (DFDR) असे दोन्ही मिळून "ब्लॅक बॉक्स" होतो. प्रत्येक विमान अपघातप्रसंगी ही दोन उपकरणे अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जातात. विमान कंपन्यांचे चालकदेखील अपघाताचे कारण शोधण्यासाठी याच लहानशा वस्तूचा मागोवा घेत असतात. वृत्तपत्रेदेखील अपघाताची माहिती देताना या गोष्टींचा तपशील द्यायला चुकत नाहीत. बारामती विमान अपघातातील (२८ जानेवारी २०२६) शरफ कंपनीच्या "लिअरजेट ४५" विमानातील "ब्लॅक बॉक्स" तपास यंत्रणांनी २४ तासांत ताब्यात घेतला. १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद विमानतळाच्या जवळच लंडनच्या दिशेनं उड्डाण करणारं (एअर इंडिया ड्रिमलायनर) प्रवासी विमान कोसळलं. त्यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह २४१ प्रवासी दगावले. एकजण आश्चर्यकारकरित्या बचावला. ह्या अपघातातही आगीचा मोठा भडका उडाला होता. तरीही दोन्हीही रेकॉर्डरसह "ब्लॅक बॉक्स" सुरक्षितरित्या सापडला. त्यातून उड्डाणाच्या वेळी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे उघडकीस आले. ह्या "ब्लॅक बॉक्स"ला एरॉनॉटिकल इंजिनियर्स "विमानात वावरणारा डिटेक्टिव्ह" म्हणतात. वैमानिक व कर्मचाऱ्यांसह सर्व प्रवासी अपघातात ठार झाल्यास ह्या निर्जीव उपकरणाद्वारेच अपघाताची योग्य माहिती उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे आपली चूक लपविण्यासाठी विमान कंपन्या कितीही खोटे बोलल्या तरी "फ्लाईट रेकॉर्डर" शिकवलेल्या पोपटाप्रमाणे धडाधड हकीकत सांगतो. अर्थात, अपघाताचा तपास यंत्रणांनी कठोर प्रामाणिकपणा दाखवला तरच!

ही ऑस्ट्रेलियन वैज्ञानिक डेव्हिड वॉरेन (जन्म १९२५; निधन २०१०) यांच्या संशोधनाची करामत आहे. त्यांच्या बालपणात त्यांच्या वडिलांचे विमान अपघातात निधन झाले. अपघाताचे कारण समजले नाही. ह्याने अस्वस्थ झालेल्या डेव्हिड वॉरेन यांनी विमान अपघाताच्या तपासासाठी टिकाऊ यंत्र तयार करण्याचा ध्यास घेतला. यातूनच त्यांनी "एरोनॉटिक्स" ह्या विषयात लंडनच्या 'इंपिरियल कॉलेज'मधून "पीएचडी" मिळवली आणि ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथील "एरोनॉटिकल रिसर्च लॅबोरेटरीज" (ARL)मध्ये संशोधक म्हणून कामाला सुरुवात केली. १९५३ मध्ये "कॉमेट" विमान अपघाताची दुर्घटना घडली. त्या निमित्ताने नव्या संशोधनाला चालना मिळाली आणि वर्षभराच्या संशोधनातून (१९५४ मध्ये) "कॉकपिट"मधील विमान उड्डाण दरम्यानच्या प्रत्येक सेकंदाचे तपशील- संवाद रेकॉर्ड करणारे यंत्र तयार झाले. "ब्लॅक बॉक्स"चा शोध लागला. मात्र, या संशोधनास आंतरराष्ट्रीय मान्यता मिळेपर्यंत त्याकडे ऑस्ट्रेलियामध्येही दुर्लक्ष करण्यात आले होते. १९६० मध्ये "ब्लॅक बॉक्स" संशोधनास आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाल्यावर व्यावसायिक विमानात "ब्लॅक बॉक्स" अनिवार्य करणारा ऑस्ट्रेलिया हा पहिला देश झाला. डेव्हिड वॉरेन यांच्या "ब्लॅक बॉक्स"च्या संशोधनामुळे विमान अपघातांचे रहस्य उलगडण्यास मदत झाली आणि जागतिक हवाई वाहतूक सुरक्षित झाली. ह्या विषयातील संशोधन कार्य डेव्हिड वॉरेन यांनी "डिफेन्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी" (DST)द्वारे पुढेही चालू ठेवले होते.

"ब्लॅक बॉक्स" हा शब्द आता सर्वांना परिचित असला तरी ह्या यंत्राचा रंग काळा आणि आकार चौकोनी खोक्याप्रमाणे नसतो. "अंधाराच्या चौकटीतील रहस्य" इतक्यापुरताच "ब्लॅक बॉक्स"ची बाह्य ओळख आहे. प्रत्येक विमान उत्पादक कंपनी वेगवेगळ्या आकारातील व प्रकारातील "ब्लॅक बॉक्स" बनवत असते. उदाहरणार्थ, पूर्वी ७४७ ह्या "जंबो जेट" विमानात बसविला जाणारा "ब्लॅक बॉक्स" हा नारिंगी रंगातील आयताकृती खोका असायचा. ४ इंच रुंद व १८ इंच लांबीचा हा खोका दुरूनही दिसावा, यासाठी त्यावर सफेद पट्टा रंगवलेला असायचा. त्यासाठी प्रकाश परावर्तित करणारा झगझगीत रंग वापरलेला असल्याने अंधारात वा खोल सागरात पडलेला "ब्लॅक बॉक्स" शोधणाऱ्याच्या नजरेला चटकन येतो. त्याचे वजन १० ते १२ किलोच्या दरम्यान असते. विमानाला आग लागलेली असो की, ते विमान कितीही उंचीवरून खाली कोसळलेले असो; तरीही आतल्या ध्वनिमुद्रण यंत्रणेला धक्का लागू नये; म्हणून त्यावर उच्च प्रतीच्या इन्सुलेशनचे अत्यंत टणक सुरक्षा कवच असते. तसेच, "टायटॅनियम" (Titanium) किंवा अत्यंत मजबूत "स्टेनलेस स्टील" धातूचा वापर केलेला असतो. यामुळे "ब्लॅक बॉक्स"ला आगीचे भय नसते. तो अतिउच्च तापमान (१,१०० डिग्री सेल्सिअस) आणि समुद्राच्या तळाशी असलेला प्रचंड दाब सहन करू शकतो. टायटॅनियम" धातू १६७० डिग्री सेल्सियसपर्यंतची उष्णता सहन करू शकत असल्याने अपघातानंतरही त्यातील डेटा पूर्णपणे सुरक्षित राहू शकतो.

"ब्लॅक बॉक्स" विमानाच्या शेपटीच्या भागात असतो. यातील "कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर-CVR" वैमानिकासह कर्मचाऱ्यांची आपसातील बातचीत व नियंत्रण केंद्राशी झालेली बातचीत मुद्रित करीत असतो. तर "डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर-DFDR"वर उड्डाणाच्या काळात सतत बदलणाऱ्या परिमाणांची व स्थितीची नोंद करत असतो. त्याच्या "मेलर टेप"वर मागील किमान २५ उड्डाण तासांतील नोंदी कायम मिळू शकतात. विमानाने आकाशात झेप घेताच ही 'मेलर टेप" नोंदी घ्यायला सुरुवात करते आणि उड्डाण असेपर्यंत ती चालू राहाते. "ब्लॅक बॉक्स" एकाच वेळी समुद्रसपाटी पासूनची उंची, विमानाची स्थिती, त्याचा वेग, हवेचा वेग, इंजिनाची थर्स्ट पॉवर व इतर १३० गोष्टींची नोंद घेऊ लागते. जवळपास सर्वच विमानात फ्लाईट रेकॉर्डरसाठी "अंडर वॉटर लोकेटर बीकॉन" (Under Water Locator Beacon) जोडलेला असतो. त्यामुळे हे उपकरण मोठे महत्त्वाचे काम करते. "ब्लॅक बॉक्स"वर अकस्मात ताण पडला; किंवा नदीच्या गोड्या व्हा समुद्राच्या खारट पाण्याचा स्पर्श झाला की, "ब्लॅक बॉक्स" बीप... बीप... असा ओरडा सुरू करतो. ३७.५ किलोहर्स्ट फ्रिक्वेन्सी असलेला हा ध्वनिसंकेत सलग ३० दिवस सुरू राहतो. म्हणूनच विमानाच्या अवशेषांचा शोध घेणारे पथक हा संकेत मिळताच "ब्लॅक बॉक्स"पर्यंत येऊन पोहोचतात. अशाच प्रकारे बारामती विमान अपघातातील तपास यंत्रणा "ब्लॅक बॉक्स"पर्यंत पोहोचली. तथापि, अपघात स्थळी कोणतेही सुरक्षा कवच नसलेले कागद सुरक्षित राहिलेले दिसतात आणि तपास यंत्रणा "ब्लॅक बॉक्स" आगीमुळे होरपळल्याचे सांगते.

ही विसंगती का आणि कशी स्वीकारायची?

# संत निरंकारी मिशनच्या वतीने संगोबा येथे नदीपात्र परिसरात स्वच्छता

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** सदगुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या असिम कृपेने सदगुरू बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या स्मरणार्थ संपूर्ण देशभरात अमृत प्रकल्पा अंतर्गत 'स्वच्छ जल स्वच्छ मन' च्या माध्यमातून नदी स्वच्छ जल अभियान राबविण्यात आले.

संत निरंकारी मंडळ करमाळा ब्रँचच्या वतीने करमाळा तालुक्यातील श्रीक्षेत्र संगोबा मंदिराचा अंतर्बाह्य परिसर तसेच सिना नदी पात्राची स्वच्छता करण्यात आली.

श्रीक्षेत्र संगोबाची महाशिवरात्रीला मोठी यात्रा ही भरते. त्यामुळे परिसर व नदीचे पात्र प्रदुषीत होते. प्रदूषण अंदर हो या बाहर दोनोही हानिकारक होता है।

संत निरंकारी मिशनच्या वतीने संपूर्ण भारतात १६०० पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळेस नदीपात्र किंवा लोकोपयोगी पाण्याचे तलाव येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

सदगुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त त्यांच्या सत्प्रेरणेने सन २०२३ पासून अमृत जल प्रोजेक्ट संत निरंकारी मिशन व भारत सरकारच्या संयुक्त विचार



प्रणालीतून सर्व मानवोपयोगी हे देशव्यापी स्वच्छता अभियान 'नरसेवा नारायण पूजा' या उक्तीप्रमाणे मोठ्या श्रध्देने राबवले जाते.

संत निरंकारी मिशनच्या वतीने प्रत्येक वर्षी संपूर्ण भारतात वृक्षारोपण अभियान, रक्तदान शिबीर, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदतकार्य व स्वच्छता अभियान ह्या संपूर्ण मानवतेसाठी उपक्रम निष्काम भावनेने राबवले जातात.

श्रीक्षेत्र संगोबा मंदिराचा अंतर्बाह्य परिसर व सिना नदीचे पात्र स्वच्छ करण्यासाठी लहान बालगोपाळासह करमाळा, जातेगाव, कामोणे, पोटेगाव, पांगरे, नेरले, निंभोरे, शेलगाव, उमरड, वाशिंबे, चिखलठाण, दहिगाव, केतूर, जवळा, केडगाव या ठिकाणाहून २०० महिला व पुरुष यांनी सहभाग घेतला.

हे स्वच्छता अभियान राबवण्यासाठी संत निरंकारी मंडळाचे ब्रँचमुखी पोपट थोरात, सेवादल अधिकारी रमेश वारे, भैरू वळेकर, वैशाली सरडे, यांच्या समवेत सर्व महिला व पुरुष सेवादल, तसेच आत्माराम वायकुळे. डॉ. भाऊसो सरडे, अंगद पडवळे, बप्पा धडस, तानाजी चव्हाण, मोहन चोरमले, योगेश चव्हाण, इन्नूस शेख, राजेंद्र भुजबळ, दादा आव्हाड, शिवाजी हजारे, राजू कारंडे या सर्वांनी परिश्रम घेतले.

# आयटी पार्कसाठी २० हेक्टर जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश

## पालकमंत्री गोरे यांची माहिती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या आयटी पार्कसाठी होटगी येथील गट नंबर ५७६ मधील २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापुरात आयटी पार्क सुरू करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे तसेच इतर लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरला आयटी पार्क करणार असल्याचा शब्द सोलापूरकरांना दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पूर्ण होण्याकडे या निर्णयामुळे एक पाऊल पुढे पडले आहे. या निर्णयामुळे आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या आदेशानुसार २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. त्यानंतर आयटी पार्कच्या उभारणीला वेग येणार आहे. सोलापूरच्या जनतेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मतदानरुपी आशीर्वाद दिले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शब्दानुसार आयटी पार्कच्या उभारणीला आता वेग येणार आहे.

सोलापूरच्या वस्त्रोद्योग व्यवसायाला इचलकरंजीच्या धर्तीवर सवलती देण्यासाठी आगामी अधिवेशनात बैठक लावण्यात येणार आहे. सोलापूरची विमानसेवा, समांतर जलवाहिनी ही कामे पूर्ण झाली आहेत. तसेच आगामी काळात अंतर्गत पाणीपुरवठ्यासाठीची कामेही लवकरच सुरू होणार आहेत, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी सांगितले.



**विकसित सोलापूरची पायाभरणी**

सोलापुरात आगामी काळात तयार होणारे आयटी पार्क म्हणजे विकसित सोलापूरची पायाभरणी असणार आहे. होटगी येथील २० हेक्टर (५० एकर) जागा औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश म्हणजे त्याचीच दमदार सुरुवात आहे. सोलापूरला आयटी पार्क सुरू होण्यासाठी मंजुरी देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यासाठी निरंतर प्रयत्न करणारे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सोलापूरांतर्फे आभार.

- **देवेंद्र कोठे,** आमदार, शहर मध्य

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार दोघांना अटक

## पोलीसांकडून नातेपुते शहरात आरोपीची धींड



सपोनि विशाल वायकर

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणात पोलिसांनी नवनाथ कर्चे आणि नारायण खांडेकर मुख्य दोन आरोपींना काही तासांत बेड्या ठोकून नातेपुते शहरातील भरस्त्यात आरोपींची धिंड काढली.

मिळालेल्या माहितीनुसार दोघा आरोपींनी पीडित मुलीचे वय अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही तिला विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केले. या गंभीर प्रकारानंतर पीडितेच्या तक्रारीवरून नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता अकलूज उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली, नातेपुते पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर आणि त्यांच्या विशेष तपास पथकाने तातडीने सूत्रे हलवली. पोलिस पथकाने शोध घेत दोन्ही आरोपींना काही तासाच्या आतच पकडून गजाआड केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर करीत आहेत.

अत्याचार प्रकरणातील दोन आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर नातेपुते पोलीस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांनी आरोपींची नातेपुते शहराच्या भररस्त्यात धींड काढली. नातेपुते पोलीस प्रशासनाचा या ॲक्शन मोड मधून गुन्हेगारावर वचक बसण्याचा प्रयत्न दिसून येत आहे. खबरदार कायदा हाती घेतला तर तुमची ही अशीच धींड काढण्यात येईल असा पोलीसी खाकीचा दमच नातेपुते पोलिसांकडून देण्यात आला आहे. नातेपुते शहरातील नागरिकांनी पोलिसांनी केलेल्या या कृतीचे स्वागत केले असून यामुळे गुन्हेगारीला व गुन्हेगारी वृत्तीला आळा बसणार आहे असे म्हटले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नवा देश घडविण्याची क्षमता विद्यार्थ्यामध्ये विकसित करा-संजय आवटे



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज जयंती, लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील यांची पुण्यतिथी व महाविद्यालयासाठी गेल्या २५ वर्षात योगदान दिलेले माजी प्राचार्य,प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ विचारवंत संजय आवटे हे होते व अध्यक्षस्थानी महारार्ष्ट राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष मा.ना.राजन पाटील हे होते.या प्रसंगी राजन पाटील यांनी शिक्षणातून संस्कार,मूल्याधिष्ठित व कौशाल्याधिष्ठित शिक्षण गरजेचे आहे तसेच त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयक मार्गदर्शन केले.या प्रसंगी संजय आवटे यांनी शिक्षण प्रवाहात मुले, पालक, शिक्षक, शिक्षण व्यवस्था, करिअर, शिक्षण व्यवस्था हे विविध उदाहरणाद्वारे सांगितले, नवा देश घडविण्याची क्षमता विद्यार्थ्यामध्ये विकसित करा असे मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी माजी प्राध्यापक प्रतिनिधी म्हणून महाविद्यालयाच्या योगदानाबद्दल मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.संतोष थिटे यांनी करुन दिला.सूत्रसंचालन प्रा.महादेव चव्हाण यांनी केले व आभार प्रा.डॉ.विशाल कदम यांनी मानले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले, माजी प्राचार्य डॉ. विलास अरबाळे,प्राचार्य महादेव चोपडे,उपमुख्याध्यापक माधव खरात माजी प्राध्यापक शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुस्लिम मावळ्याच्या वतीने अनोखी शिवजयंती साजरी



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहर व तालुक्याच्या वतीने उडान फाउंडेशन च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती उत्सव भव्य दिव्य स्वरूपात साजरी करण्यात येते. याही वेळी उडान फाउंडेशन च्या वतीने शिवस्मारक या ठिकाणी पुष्पहार अर्पण करून व समाजातील वंचित दुर्बल घटकापैकी पारलिंगी, सफाई कर्मचारी, नर्स (मावशी) ,माता भागिनींचा यावेळी शिवजयंती निमित्त गौरव करून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा करण्यात पारलिंगी समुदाय हा समाजाचा अविभाज्य भाग असून, सांस्कृतिक, सामाजिक आणि मानवी हक्कांच्या क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. ते समाजात सर्वधर्मसमभाव आणि विविधतेचे प्रतीक म्हणून ओळखले जातात, हा समुदाय धार्मिक भेदभाव करत नाही. सर्व धर्म समभाव मानून हे लोक वेगवेगळ्या धार्मिक स्थळांचा आदर करतात, जे सामाजिक सलोख्यासाठी गरजेचे आहे.

सफाई कामगार हे शहरांचे आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण सुरक्षित ठेवणारे खरे 'स्वच्छता दूत' आहेत. त्यांच्या अतुलनीय कष्टांमुळेच शहर आणि नागरिकांचे आरोग्य टिकून राहते.

परिचारिका मावशी रुग्णांना २४ ७ ७ उपचार, काळजी आणि मानसिक आधार देतात, माता-बाल संगोपन, या केवळ नोकरी करत नाहीत, तर रुग्णांना नवीन जीवन मिळवून देण्यासाठी निष्ठेने सेवा देतात, ज्यामुळे त्यांना आरोग्य व्यवस्थेचा 'कणा' मानले जाते. यासाठी त्यांचा उडान फाउंडेशनच्या वतीने गौरव करण्यात आला,तसेच शिवजयंतीचा दुसरा उपक्रम म्हणून एका गरजवंत कुटुंबांला लहान बाळाच्या उपचारासाठी आर्थिक मदत करण्यात आली.

या वेळी कार्यमाचे अध्यक्ष सचिन वायकुळे,प्रमुख पाहुणे डॉ.मौलाना शेख, डॉ.गुलाब अंगारशा, सुलतान शेख वननिरीक्षक, जय शिवराय प्रतिष्ठान अध्यक्ष विजय राऊत, छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष टिंकू पाटील, माजी नगरसेवक कय्युम पटेल, सादिक मुल्ला यांनी या वेळी मार्गदर्शन केले तर यावेळी उडान फाउंडेशन अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष जाफर शेख, कार्याध्यक्ष शकील मुलाणी, सचिव जमील खान, सह सचिव अख्तर शेख,मोहसीन पठाण, अकिब पठाण, साजन शेख, सामीर वळसंगकर, राजु शिकलकर, रज्जाक शेख, खाजा पठाण, साजिद मुल्ला, तोसिफ बागवान, गणेशजी गोडसे, स्वप्नील पोकळे, अमोल झांबरे तसेच युवा उडान फाउंडेशन अध्यक्ष सलमान बागवान, रहीम शेख, शहबाज मुल्ला, शहाबाज मुलाणी असे असंख्य मुस्लिम मावळे, शिवस्मारक येथे उपस्थित होते या वेळी सूत्र संचालन किरण कोकाटे यांनी केले तर जमील खान यांनी आभार मानले.

# शिवरत्न सेमी मध्ये स्पर्धा परीक्षा अकॅडमी सुरू करणार- शितलदेवी मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उत्साह, आनंद आणि टाळ्यांच्या कडकडाटात, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा, अकलूज मधील स्मृतिभवन या ठिकाणी दिमाखात पार पडला. आकर्षक सजावट, रंगीबेरंगी प्रकाशयोजना आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते पाटील यांच्या प्रतिमांना अभिवादन करून, शिवरत्न उत्सवाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलनाने झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस पं. स. गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, अध्यक्षस्थानी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी धैर्यशील मोहिते पाटील उपस्थित होत्या तर रीलस्टार आर. जे.सागर भालेराव, ताराराणी कुस्ती केंद्राच्या अध्यक्षा कु. ईशितादेवी धैर्यशील मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, सदस्य नितीन बनकर, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे चेअरमन रामकृष्ण काटकर, सदस्य एच डी भोसले, शंकर गायकवाड, शिवदत्त नारायणकर, यशवंत नगर केंद्राचे केंद्रप्रमुख विठ्ठलराव काळे, जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा यशवंतनगरचे मुख्याध्यापक बंडू खडतरे, एस एम पी स्कूलचे प्राचार्य अल्बर्ट थारकन , शिवरत्न स्कूलच्या प्रिन्सिपल सौ बिनो पाऊलसो, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष सचिन बोरावके , शिवरत्न अकॅडमीचे प्रमुख राजकिरण माने देशमुख , मॅथ्स ओलंपियाडच्या संचालिका मेघा घुले यांची उपस्थिती लाभली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना शितलदेवी मोहिते पाटील म्हणाल्या शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष 2026- 27 साठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत, पालक आणि शिक्षकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र माने देशमुख यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन इयत्ता आठवीतील कु.ज्योती औदुंबर सावंत आणि कु. प्रणाली श्रीनिवास मुळे या दोघींनी केले.

# प्रा.कुंडलिक गुंड यांना विद्यापीठाची पीएचडी पदवी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील शासकीय अधिकारी व नोकरदारांचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलवाडीचे रहिवासी व सध्या बार्शी येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्रा.कुंडलिक ज्ञानदेव गुंड यांना सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाची इंग्रजी विषयातून पीएचडीची पदवी प्राप्त झाली आहे.

प्रा.कुंडलिक गुंड हे मागील 25 वर्षांपासून इंग्रजी विषयाचे उत्कृष्ट पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करीत आहेत. आजतागायत त्यांचे इंग्रजी विषयाच्या विभागीय व राज्य पातळीवर शोधपत्रिका प्रसिद्ध झाल्या असून विविध ठिकाणच्या सेमिनारमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. इंग्रजी विषयाचे हाडाचे व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. इंग्रजी विषय जरी अवघड व कठिण वाटत असला तरी ते विद्यार्थ्यांना सहज सोप्या भाषेत हसतखेळत व आनंददायी पद्धतीने शिकवतात.त्यांनी ""A Critical Analysis of the Male Characters in the Selected Novels of Anita Brookner"" या विषयावर संशोधन करून विद्यापीठाकडे शोधनिबंध सादर केला होता त्यास विद्यापीठ व तज्ञ मार्गदर्शकांच्या कमिटीने मंजुरी देऊन त्यांना पीएचडीची पदवी प्राप्त झाली आहे.

त्यांना बार्शी येथील झाडबुके महाविद्यालयाचे प्रा.डॉ.वैभव वाघमारे यांचे मार्गदर्शन व वाशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम व प्राध्यापक मित्रमंडळी,बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.विष्णू वाघमारे, सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड यांच्यासह अनेकांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे.ते विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर,नारायण गुंड सर, प्राथमिक शिक्षक गणेश गुंड यांचे चुलत बंधू आहेत. विठ्ठलवाडी येथील गुंड परिवार हा सुशिक्षित, सुसंस्कृत आणि शासकीय नोकरदारांचा आहे. यानिमित्ताने गुंड परिवाराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

पीएचडी पदवी प्राप्त झाल्याबद्दल प्रा.कुंडलिक गुंड यांचा वाशी महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक स्टाफ आणि शिक्षक मित्रमंडळी व नातेवाईकांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंगळवेढा तालुक्यात लिंगीरा ओढ्यात पाणी सोडले

## शेतकरी व पशुधनासाठी मोठा दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांच्या मागणीमुळे, मंगळवेढा तालुक्यातील नागरिक, शेतकरी व पशुधनासाठी दिलासा देणारी महत्त्वाची कारवाई जलसंपदा विभागाकडून करण्यात आली आहे. तीव्र उन्हाळा आणि वाढती पाणीटंचाई लक्षात घेता, मंगळवेढा तालुका येथील उजनी उजवा कालवा (१०८ किमी) डोंगरगाव SKP मधून लिंगीरा ओढ्यात पाणी सोडण्यात आले आहे.

लिंगीरा ओढ्यावर अवलंबून असलेल्या अनेक शेतकऱ्यांना तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याची तीव्र कमतरता भासत होती. ओढ्यात पाणी नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गंभीर परिस्थिती ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

ऐन उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन, दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी खासदार प्रणिती शिंदे यांनी मा. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, सोलापूर यांच्याकडे निवेदन सादर करत तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या निवेदनात उजनी उजवा कालवा (१०८ किमी) डोंगरगाव तालुका मंगळवेढा रङढ मधून लिंगीरा ओढ्यावरील सिमेंट बंधारे भरण्यासाठी त्वरित पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. पाणी न सोडल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

या मागणीची तात्काळ दखल घेत जलसंपदा विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देत लिंगीरा ओढ्यात पाणी सोडण्याची कार्यवाही केली. पाणी सोडण्यात आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचा मोठा दिलासा मिळाला असून, नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.**
**कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, जि. पुणे**
**दूरध्वनी क्रमांक ०२१११-२९५७९४**
**ई-मेल-ujjanihydroindapur@yahoo.in**
**निविदा सुचना क्र. ब-१/२२/सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत परवानाधारक सोलापूर जिल्हयातील सुशिक्षीत बेरोजगार विद्युत अभियंत्यांकडून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळा करिता ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामासाठी कोरे निविदा संचाची प्रत कार्यकारी अभियंता, उजनी जलविद्युत विभाग, इंदापूर, जि. पुणे यांच्या कार्यालयात दिनांक २५/०२/२०२६ पासून ०४/०३/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत मिळू शकेल व सदर कालावधीत वर दर्शविलेल्या कार्यालयात दिनांक ०६/०३/२०२६ दु. १७.०० वाजेपर्यंत सिलबंद निविदा स्विकारल्या जातील. शक्य असल्यास त्याच दिवशी सर्व सिलबंध निविदा उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत (रुपये) | को-या निवीदा संचाची किंमत रुपये जी.एस.टी सह (ना परतावा) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शिराळा उपसा सिंचन योजना ३३/३.३ के.व्ही. कळयंत्र आवारातील विदयुत उपकरणांची आपात्कालिन देखभाल दुरूस्ती करणे काम. ता- परांडा, जि-धाराशिव | रू.१,६८,०२८/- | ११८०/- | ३ महीने |
| २ | सिना कोळेगाव उपसा सिंचन योजना करमाळा व परांडा बाजू येथील ३३ के. व्ही. कळयंत्र आवारातील विदयूत उपकरणांची आपात्कालिन व नियमित देखभाल दुरूस्ती करणे काम. | रू.२,५४,२१६/- | ११८०/- | ३ महीने |
| ३ | सिना मेहेकरी उपसा सिंचन योजना ३३/६.६ के.व्ही. कळयंत्र आवारातील विदयुत उपकरणांची आपात्कालिन देखभाल दुरूस्ती करणे काम. ता-आष्टी, जि-बीड | रू.१,६९,०७५/- | ११८०/- | ३ महीने |
| ४ | आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्र. १ व २,ता- मोहोळ, जि-सोलापूर येथील ३३ के. व्ही. कळयंत्र आवारातील विदयुत उपकरणांची देखभाल दुरूस्ती काम. | रू.५,९२,९३४/- | ११८०/- | ६ महीने |

सुचना :- १) निविदा पत्रासोबत नोदणी प्रमाणपत्र, आयकर दाखला, जोडणे बधंनकारक आहे
२) https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळवार - निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
३) निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचे किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

जा.क्रं.क'अ/उजविवि/निविदा/२२८ सन-२०२६
उजनी जलविद्युत विभाग इंदापूर
दिनांक १३/०२/२०२६
जिमाका/सो/जाहि/३३३/२०२५-२६

**सही/- (प्र.पुं. बिराडे)**
**कार्यकारी अभियंता**
**उजनी जलविदयुत विभाग इंदापूर**

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

### CHANGE IN NAME

I am changing my name from **FARIN HAJI ARIF SHAIKH TO FARHIN MOHAMMED ARIF SHAIKH** for passport issuance.

### CHANGE IN NAME

: I am changing my name from **SHAIKH MASIHA BEGUM TO FARIN HAJI ARIF** SHAIKH for passport issuance.

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 178

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# माझी वसुंधरा ४.० अभियानांतर्गत सोलापूर महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा ४.० अभियानांतर्गत सोलापूर महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत 'भूमी' या घटकात राज्यस्तरावर ३ लाख ते १० लाख लोकसंख्या गटामध्ये एकमेव शहर म्हणून मानाचा दोन कोटी रुपयांचा विशेष पुरस्कार पटकावला होता या उल्लेखनीय यशामुळे पुणे विभागात सोलापूर महानगरपालिका प्रथम क्रमांकावर ठरली आहे.

मुंबई येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मननीय राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री मा. सुनेत्रा पवार, महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष मा. राहुल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा पंकजा मुंडे यांच्या हस्ते पुरस्कार सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांना देण्यात आले यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, महेश देवकर, मनोज देवकर, उद्यान अधिकारी स्वप्नील सोलंकर, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे जनसंपर्क अधिकारी श्री गणेश बिराजदार उपस्थित होते.भूमी' या घटकांतर्गत सोलापूर महानगरपालिकेने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विविध व्यापक उपक्रम राबविले होते. वन विभाग, पर्यावरणप्रेमी संस्था, स्वयंसेवी संघटना तसेच महाविद्यालयांच्या सहकार्याने शहरात मोठ्या प्रमाणावर देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली होती मागील काही वर्षांत लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करून त्यांची वाढ व जतन सुनिश्चित करण्यात आले आहे. शहरातील विविध भागांत रोपवाटिका उभारून हरित पट्टे विकसित करण्यात आले असून शहर हरित व सुंदर करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच घरोघरी कचरा संकलन करून त्यावर प्रक्रिया करत वीज निर्मिती व सेंद्रिय खत निर्मिती केली जात आहे. सिंगल युज प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यापक जनजागृती मोहिमा राबविण्यात येत असून दंडात्मक कारवाईही करण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत सोलापूर शहराने 'ओडीएफ प्लस प्लस' दर्जा कायम राखला आहे. स्वच्छता व पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे सोलापूर शहराने राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या सर्वसमावेशक पर्यावरणीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेऊन सोलापूर महानगरपालिकेला हा बहुमानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून ही कामगिरी संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. महापौर विनायक कोंड्याल यांनी या यशाचे श्रेय महानगरपालिकेचे आयुक्त, अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच सोलापूरकर नागरिकांना दिले असून भविष्यातही पर्यावरण संवर्धनासाठी अधिक जोमाने कार्य करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

# अकलूज येथे डीजेचा धुमाकुळ ११ शिवजयंती मंडळावर गुन्हे दाखल



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलुज पोलीस ठाणेस शिवजंयती उत्सव २०२६ मिरवणुकीतील मंडळ व डीजे धारकांवर ध्वनी प्रदुषण कायदया अंर्तगत ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,अतुल कुलकर्णी पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण व प्रितम यावलकर अप्पर पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांनी, सोलापुर जिल्हयातील सर्व शिवजंयती उत्सव मंडळे व शिवप्रेमी नागरिकांची, शिवजयंती उत्सव २०२६ चे अनुषंगाने,पोलीस मुख्यालय सोलापुर ग्रामीण येथे बैठकी आयोजित केली होती. सदर बैठकीत सोलापुर ग्रामीण हद्दीतील नागरीकाना, शिवजयंती मिरवणुकीत डिजे,डॉल्बीचा वापर न करता, पारंपारिक वाद्यांचा वापर करण्याचा व शिवजंयती उत्सव कालावधीत सामाजिक उपक्रम राबविण्याचे अहवान करण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने अकलुज पोलीस ठाणेस संतोष वाळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलुज उपविभाग व निरज उबाळे पोलीस निरीक्षक अकलुज पोलीस ठाणे यांनी अकलुज पोलीस ठाणे हद्दीत शिवजयंती उत्सव २०२६ हा शांततेत, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणुन हद्दीतील सर्व शिवजंयती उत्सव मंडळे, डिजे व डॉल्बीधारक चालक तसेच नागरीकाची बैठक घेवुन शिवजंयती मिरवणुकीत डिजे डॉल्बीचा वापर न करता, पारंपारिक वाद्यांचे वापर करुन, मिरवणुक शांततेत पार पाडण्याचे व उत्सव कालावधीत सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. मिरवणुकी दरम्यान ध्वनी प्रदुषण कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणेबाबत, सर्व मंडळांना सुचना देवुन त्यांना भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे नोटीस देण्यात आल्या होत्या.

दिनांक २०/०२/२०२६ रोजी अकलुज शहरातील वेगवेगळ्या शिवजंयती उत्सव मंडळाने मिरवणुकीत मोठ्या आवाजात डिजे/डॉल्बी व लेजर शोचा वापर करुन सार्वजनिक शांतता भंग करुन, सामान्य नागरिकांना त्रास होईल असे कृत्य करुन, ध्वनीप्रदुषण कायदयाचे उल्लंघन केले तसेच, जिल्हाधिकारी सोलापुर यांचे कडील जा.क. २०२६/डिसीबी-२/आरआर-११० दिनांक १२/०१/२०२६ चे आदेशाचे उल्लघंन केले म्हणुन, अकलुज पोलीस ठाणे हद्दीतील ११ शिवजयंती उत्सव मंडळ व डिजे/डॉल्बी चालकांविरुध्द अकलुज पोलीस ठाणेस, भारतीय न्याय संहिता २०२३ वे कलम २२३,२ (१) व ध्वनी प्रदुषण अधिनियत २००० चे कलम ३,४,८ व पर्यावरण संरक्षण अधिनियत १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असुन त्याचा तपास चालु आहे.

**गुन्हे दाखल असलेल्या मंडळाची व डिजेधारकांची नावे व त्यांनी उल्लंघण केलेल्या ध्वनीप्रदुषण पातळी खालील प्रमाणे...**

हिंदवी प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे / 108 डेसीबल, लहुजी साम्राज्यप्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/115 डेसीबल, सहयाद्री प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/105 डेसीबल, छावा ग्रुप शिवंजयती उत्सव मंडळ अकलूज, व डिजे/105 डेसीबल, स्वराज्य प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ यशवंतनगर, व डिजे/112 डेसीबल, नवक्रांती प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/117 डेसीबल, शिवदत्त प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलूज, व डिजे/110 डेसीबल, रामरहिम प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे 118 डेसीबल,

संभाजीराजे प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/125 डेसीबल, शिवमुद्रा प्रतिष्ठाण शिर्वजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/110 डेसीबल, महाराज प्रतिष्ठाण शिवंजयती उत्सव मंडळ अकलुज, व डिजे/107 डेसीबल,

# देशाच्या जागतिक प्रतिमेला धक्का पोहोचवणाऱ्या आंदोलनाच्या निषेधार्थ आंदोलन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) समिटच्या पार्श्वभूमीवर देशाच्या जागतिक प्रतिमेला धक्का पोहोचवणाऱ्या विरोधी आंदोलनाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्ष अक्कलकोट यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

भारत हा वेगाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल करणारा देश असून कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात मोठी प्रगती साधण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. या समिटचे उद्दिष्ट भारताला जागतिक स्तरावर अकतंत्रज्ञानात अग्रगण्य बनवणे तसेच परदेशी गुंतवणूक, स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान भागीदारी वाढवणे हे होते.

मात्र या महत्त्वपूर्ण कार्यक्रमादरम्यान भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून करण्यात आलेल्या आंदोलनामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चुकीचा संदेश जाण्याची शक्यता निर्माण झाली. यामुळे परदेशी गुंतवणूकदारांच्या विश्वासावर परिणाम होण्याबरोबरच भारताच्या अर्थव्यवस्थेची आणि स्टार्टअप क्षेत्राची प्रतिमा धोक्यात येण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

आज अमेरिका आणि चीन यांच्यानंतर अकक्षेत्रात भारतानेही आघाडी घ्यावी यासाठी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ठोस पावले उचलली जात आहेत. अशा राष्ट्रीय प्रगतीशी संबंधित उपक्रमांना देशांतर्गत राजकीय स्वार्थातून विरोध करणे ही अत्यंत निंदनीय व दुर्दैवी बाब असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

भारतीय जनता पक्ष अक्कलकोटच्या वतीने देशहिताच्या मुद्द्यांवर ठाम भूमिका घेत पुढेही अशा प्रकारच्या राष्ट्रविरोधी कृत्यांचा निषेध करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अकलूज येथे राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती शंकरनगर अकलूज यांच्यावतीने दि. २८ फेब्रुवारी व दि. १ मार्च २०२६ रोजी स्मृतीभवन शंकरनगर अकलूज येथे राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांनी दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या विश्रामगृहात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले, जयंती समारंभ समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी सहकार महर्षींचे अमृत महोत्सवी जयंती वर्ष जानेवारी १९९३ पासून राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला सुरुवात केली व सन २०१८ पर्यंत अविरतपणे हा लावणीचा प्रवास चालला. या स्पर्धेमुळे लावणी कलाकारांना परदेशात कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. तर अनेक कलावंतांना चित्रपट, रियालिटी शो मधून काम मिळाले. महाराष्ट्रभर कलाकारांचा लौकिक प्राप्त झाला.अकलूजची लावणी देशा बरोबरच परदेशातही गेली.

या लावणी स्पर्धाचा प्रवास समितीच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी पुढे सुरु ठेवण्याचे ठरवले. त्यानुसार सन २०२४ पासून सदरच्या स्पधेर्ला पुन्हा जोमाने सुरुवात केली.व आजही या स्पर्धेचे नियोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

या वर्षीचे स्पर्धेचे हे २९ वे वर्ष असून सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या १०८ व्या जयंती निमित्त स्मृतीभवन शंकरनगर च्या बादशाही रंगमंचावर या स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण ११ निवडक पाट्यांना सहभाग देण्यात आला आहे. पारंपरिक व नवकवींच्या लावण्यांचा नजराणा, ढोलकीची थाप, त्याला घुंगराची साथ, पदण्यासाची नजाकत, सोबतच पेटीची संगत यांचा अनुभव रसिकांना लाभणार आहे.

या वेळी समितीचे सुभाष दळवी, महादेव अंधारे, अशोक जावळे, विजय दोशी, पोपटराव भोसले पाटील, बिभिषन जाधव, संजय गळीतकर सुहास थोरात, सतीश यादव व समितीतील सदस्य उपस्थित होते. प्रवेशिकासाठी ९७६४११३६९५ या क्रमांकावर संर्पक करण्याचे अवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या स्पर्धे साठीची भव्य पारितोषिके खालील प्रमाणे

प्रथम क्रमांकास रुपये तीन लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख, तृतीय क्रमांकास रुपये एक लाख, तर उत्कृष्ट नृत्यांगना रुपये ५ हजार व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील स्मृती चषक, उत्कृष्ट अदा (वैयक्तिक) रुपये ५ हजार, उत्कृष्ट मुजरा रुपये ३ हजार, उत्कृष्ट ढोलकीपटू, उत्कृष्ट पार्श्वगायिका, उत्कृष्ट पेटीवादक, व उत्कृष्ट तबलावादक यांना प्रत्येकी रुपये १ हजार.

अशी पारितोषिक देण्यात येणार आहेत

**स्पर्धेतील सहभागी पाट्यां याप्रमाणे--**

शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी २०२६ रोजी

१) वैशाली समसापुरकर जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी. (२) काजल-स्वाती जळगावकर अलंकार सांस्कृतिक कला केंद्र, सुपा जि. अहिल्यानगर (३) बेला, श्रद्धा नेटूरकर जय भवानी सांस्कृतिक कला केंद्र, खोसपुरी पंढरीचापूल जि. अहिल्यानगर (४) अपर्णा, कीर्ती नगरकर लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र, सणसवाडी जि. पुणे (५) गीता, श्रुती वाईकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, गोकुळ शिरगाव ता. कागल जि. कोल्हापूर.

**रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी**

(१) छाया, पूजा, श्रद्धा कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप वाठार जि. कोल्हापूर

(२)जोत्स्ना वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र,वेळे ता.वाई जि.सातारा (३) नटरंग सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर (४) राजनंदिनी सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, यवत चौफुला जि. पुणे (५) वैष्णवी कोल्हापूरकर रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, अंबप वाठार जि. कोल्हापूर (६) न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी, यवत चौफुला जि. पुणे.

# प्रभागात आता केवळ आश्वासने नाही तर कृतीतून विकास दिसेल- किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका नागरी दलितेतर योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक २२ बुवा गल्ली मध्ये तब्बल १४ लाख १८ हजार ४९२ रुपयांच्या खर्चातून रस्ता कामाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. या कामाच्या निमित्ताने प्रभागातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. नुकतेच निवडणुकीच्या प्रचारार्थ सोलापूर हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणामध्ये झालेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी प्रभाग २२ मधील विकासासाठी महत्त्वाची घोषणा केली होती, आज त्या शब्दाची पूर्तता करत त्यांनी विकासाच्या नव्या पवार्ची सुरुवात झाली आहे. जोपर्यंत सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा होत नाही, तोपर्यंत मी डोक्यावर फेटा बांधणार नाही, अशी भूमिका घेणारे सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे हे खऱ्या अर्थाने जनतेचे सक्षम आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व असल्याची भावना नगरसेवक किसन जाधव यांनी व्यक्त केली. माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड यांच्या सहकार्याने आणि विद्यमान नगरसेवक दत्तात्रय नडगिरी, चैत्रालीताई शिवराज गायकवाड व अंबिकाताई नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून हा विकासप्रकल्प साकार झाला. प्रभाग २२ चे नगरसेवक किसन जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देवेंद्र कोठे यांचे कार्य आणि विकासात्मक धोरणे प्रभागासाठी मोलाची ठरत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे प्रभाग २२ चा विकास आता कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे तरुण तडफदार युवा आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली आणि सहकार्याने प्रभाग २२ च्या विकासाचा वेग अधिक वाढवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

प्रभाग २२ मध्ये आता केवळ आश्वासने नाहीत, तर कृतीतून विकास दिसत आहे. हा शुभारंभ म्हणजे आगामी काळातील सर्वांगीण प्रगतीचा नांदीघोष ठरला आहे. या रस्ता काम शुभारंभ प्रसंगी नारायण मामा कांबळे, दत्ता मामा जाधव, शिवाजी कांबळे, सुरेश मामा टेळे, अजित लकडे, बाळासाहेब वाघमारे, शिवाजी इरकर, पवन खांडेकर, महालिंग जाधव, प्रकाश केकडे, अमोल भाऊ जगताप, देविदास जगताप मामा महाराज, कुमा मामी लकडे, भागाताई पाटणकर, शारदाताई जगताप, मोरे मावशी, शुभांगी ताई लकडे, गंगू मावशी जरग, संगीता ताई सरवदे, गंगोताई कांबळे, वनिता ताई पाटील, पूजाताई पाटणकर, कल्पनाताई चोरगे, इरकर ताई, खंडागळे ताई, अनिताताई जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती

# अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते पै. कु.धरती बनसोडे हिचा सत्कार



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील सदलापूरची कन्या व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले पैलवान ग्रुपची पै. धरती बनसोडे ही राजस्थान मधील उदयपुर येथील अखिल भारतीय अग्निशमन सेवा कुस्ती स्पर्धा व मुंबई शहर उपनगर खासदार केसरी ची मानकरी ठरली आहे. या स्पर्धेत ०२ रौप्यपदक, ०१ कांस्यपदक व मुंबई शहर उपनगर खासदार केसरीची मानकरी ठरल्याबद्दल अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते पै. कु.धरती बनसोडे हिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी, मैनुद्दीन कोरबू, अतिश पवार, निखील पाटील, सर्फराज शेख, सुहास सुरवसे, विराज माणिकशेट्टी, मल्लेशप्पा बनसोडे, दत्ता माने, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, शिव स्वामी, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्वीकृत नगरसेवक श्रीनिवास दायमा यांचे शिंगवी ज्वेलर्स परिवारातर्फे सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ज्यांची ओळख आहे. आणि ज्यांनी अनेक सामाजिक कामे निष्काम भावनेने केले अशा श्रीनिवास दायमा यांचे स्वीकृत नगरसेवक म्हणून सोलापूर महानगरपालिकेत निवड झाल्या निमित्त शिंगवी ज्वेलर्स चे प्रमुख प्रदीप कुमार शिंगवी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अशा निस्सिम कार्यकर्त्यांचे पश्चिम मंगळवार पेठ येथील सुप्रसिद्ध अशा शिंगवी ज्वेलर्स परिवारातर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत तापडिया, विनय शिंगवी, गोपाल दायमा, अविनाश म्हमाणे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना श्रीनिवास मालपुरी यांनी केले तर आभार श्रीकांत दायमा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश कांदीकटला, गणेश नादरगी, दिनेश वेदपाठक तसेच सर्व स्टाफ यांनी प्रयत्न केले.

# विधानपरिषदेसाठी वीरशैव लिंगायत युवा चेहरा म्हणून माझ्या नावाचा विचार व्हावा- सुदीप चाकोते



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिल्ली येथे मल्लिकार्जुन खर्गे साहेबांची भेट घेऊन विधानपरिषदेसाठी मी इच्छुक असल्याची अधिकृत विनंती केली. यावेळी पक्ष संघटन, आगामी राजकीय दिशा आणि युवकांच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाली.

पक्ष अत्यंत अडचणीच्या काळातून जात असताना गेल्या २५ वर्षांपासून मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ची विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य प्रामाणिकपणे केले आहे. युथ काँग्रेसचा अध्यक्ष असताना सोलापूर जिल्ह्यात युवकांची मोठी फळी उभी केली. संपूर्ण महाराष्ट्रभर तसेच दिल्लीमध्येही आंदोलनं केली; पोलिसी कारवाईला सामोरं जात अनेक गुन्हे अंगावर घेतले, तरीही पक्षाशी एकनिष्ठ राहिलो. काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेडच्या माध्यमातून युवकांना काँग्रेसची विचारधारा प्रशिक्षणाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचवत आहोत. प्रतिकूल परिस्थितीतही पक्षाशी तत्वनिष्ठ राहून काँग्रेस पुन्हा बळकट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. मी लिंगायत समाजाचा असून महाराष्ट्रात सव्वा कोटी ते दीड कोटी लिंगायत बांधव आहेत—विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. सध्या मी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभेचा राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहे.

जर विधानपरिषदेत युवक वीरशैव लिंगायत चेहरा म्हणून मला संधी मिळाली, तर संपूर्ण महाराष्ट्रातील लिंगायत समाजाला एका छत्राखाली संघटित करून २०२९ मध्ये पक्षाला निश्चितच मोठा राजकीय लाभ मिळवून देता येईल, असा विश्वास आहे. असे सुदीप चाकोते यांनी सांगितले.

# लोककल्याणकारी राजे छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रयतेच्या कल्याणासाठी स्वराज्याची उभारणी करणारे आणि जनतेच्या मनामनात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ शूर योद्धे नव्हते, तर लोककल्याणकारी आणि न्यायनिष्ठ राज्यव्यवस्थेचे दूरदर्शी प्रणेते होते.

अन्याय, अत्याचार आणि परकीय सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेला संघर्ष हा फक्त सामर्थ्याचा नव्हे, तर स्वत्व, सन्मान आणि अस्मितेचा लढा होता. हिंदवी स्वराज्य संस्थापक युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजीमहाराज चौकातील अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि छत्रपती शिवाजीमहाराज की जय अशा घोषणा देत सर्वांना शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या यាប्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश सचिव आनंद मुस्तारे माजी सभागृह नेते मगबुल मोहळकर जेष्ठ नेते हेमंत चौधरी जेष्ठ नेते श्रीनिवास कोंडी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले लिगल सेल अध्यक्ष जयप्रकाश भंडारे चित्रपट सांस्कृतिक विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर सोशल मिडीया कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे वैद्यकीय मदत कक्ष बसवराज कोळी अमोल कळम निशांत तारानाईक आदी उपस्थित होते.

# सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने शालेय साहित्य वाटप करून शिवजयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त,अकलूज येथील सम्राट प्रतिष्ठानच्या वतीने शालेय साहित्य वाटप करून शिवजयंती साजरी करण्यात आली.तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित महिलांनी अभिवादन केले.

सदरचा कार्यक्रम सम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत भोसले व अध्यक्ष कोमलताई शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला.

यावेळी जया कांबळे,पूजा वाघमारे,तमन्ना पठाण,हिना नदाफ, मुमताज बागवान,वनिता शेंडगे, आसावरी खंडागळे, संगीता कांबळे, लता माने, कोमल मोरे, रूबीना बागवान, प्रीती पोळ,लक्ष्मी कांबळे, भगत ताई, शिवानी अडगळे इत्यादी उपस्थित होत्या. यावेळी सम्राट प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कोमलताई भोसले म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत.

त्यांचा पराक्रम आजही प्रेरणादायी आहे.

स्त्रियांचा सन्मान आणि प्रजेची सुरक्षितता यावर महाराजांनी अधिक भर दिला. त्यांनी शिस्तबद्ध आणि सक्षम प्रशासन व्यवस्था निर्माण केली. सध्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन, महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यक्रमावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे. त्यांचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि त्यांच्या विचारांची जयंती साजरी झाली पाहिजे असे त्या म्हणाल्या.